## MAHARASHTRA ACT No. L OF 1977

### THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (REGULATION) AND MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES (AMENDMENT) ACT, 1977.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ९ नोव्हेंबर १९७७ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. L OF 1977

### AN ACT FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (REGULATION) ACT, 1963, AND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक १५ नोव्हेंबर १९७७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०.

**महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यांत आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यांत यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी आणखी सुधारणा करण्यासाठी राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाल्याने त्यांनी महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, १९७७ हा २७ सप्टेंबर १९७७ रोजी प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :---

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, १९७७ असे म्हणता येईल.

(२) तो २७ सप्टेंबर १९७७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

१९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३०-अ ची सुधारणा. २. महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ याच्या कलम ३०-अ मध्ये पोट-कलम (६) नंतर, शेवटी पुढील स्पष्टीकरणाची भर घालण्यात येईल :--- १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

"स्पष्टीकरण.---हे कलम, कलम ३१ व कलम ३४-अ यांच्या प्रयोजनांकरिता, "खरेदीदार" या शब्दामध्ये, जी व्यक्ती विक्रीसाठी देऊ केलेल्या कोणत्याही अधिसूचित उत्पन्नाची किंवा यथास्थिती शेतीच्या उत्पन्नाची खरेदीची किंमत देईल किंवा जिच्याकडून तिच्या स्वतःच्या खात्यावर किंवा एजन्ट म्हणून किंवा कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने अशा किंमतीचा भरणा करण्यात येईल, अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.".

१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४८-अ ची सुधारणा. ३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ४८-अ यातील,--- १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(अ) पोट-कलम (१) मध्ये,---

(एक) "व यानंतर नमूद करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) "संस्थांनी दिलेल्या कर्जापोटी करावयाच्या वजातीची रक्कम" या शब्दानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :---

"ही, राज्य शासनास, त्याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करता येईल अशा दराने वजा करण्यात येईल, तथापि असा दर हा" ;

(तीन) बाब (दोन) मध्ये "कपाशीचे" या शब्दाऐवजी "कापसाचे" हा शब्द दाखल करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (३) नंतर, शेवटी, पुढील स्पष्टीकरणाची भर घालण्यात येईल :---

"स्पष्टीकरण.---या कलमाच्या प्रयोजनाकरिता, "खरेदीदार" या शब्दात, जी, विक्रीसाठी देऊ केलेल्या कोणत्याही शेतीच्या उत्पन्नाची खरेदीची किंमत देईल किंवा जिच्याकडून स्वतःच्या खात्यावर किंवा एजन्ट म्हणून किंवा कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने अशा किंमतीचा भरणा करण्यात येईल, अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.".

१९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती. ४. (१) महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, १९७७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.

१९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(२) अध्यादेशाचे असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारलेल्या महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याअन्वये (दिलेल्या कोणत्याही आदेशासह) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही या अधिनियमान्वये सुधारलेल्या संबंधित अधिनियमांन्वये करण्यात आल्याचे किंवा केली असल्याचे किंवा यथास्थिती देण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद),

य. ह. कानिटकर,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.